IJARSCT
ISSN: 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# ग्लोबलायझेशन आणि मराठीची सांस्कृतिक ओळख

**सुचिता यल्लाप्पा कांबळे**
मराठी विभाग
विलिंग्डन महाविद्यालय, सांगली (स्वायत्त), महाराष्ट्र, भारत

**सारांश** (Abstract): *आजच्या काळात पर्यावरण हा संपूर्ण जगासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि चिंतेचा विषय बनला आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण, लोकसंख्येची वाढ आणि नैसर्गिक संसाधनांचा अति- वापर यामुळे पृथ्वीवरील पर्यावरणाचे संतुलन मोठ्या प्रमाणावर बिघडले आहे. याचा परिणाम म्हणून हवामान बदल, तापमान वाढ, दुष्काळ, पूर, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास यांसारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे मानव आणि निसर्ग यांच्यातील नाते नव्याने समजून घेण्याची गरज निर्माण झाली आहे. मानवाच्या जीवनात निसर्गाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मानवाला जगण्यासाठी लागणाऱ्या अन्न, पाणी, हवा, ऊर्जा आणि निवारा या सर्व गोष्टी निसर्गातूनच मिळतात. त्यामुळे मानव आणि निसर्ग यांच्यातील संबंध अतूट आहेत. प्राचीन काळात मानव निसर्गाशी सुसंवाद साधून जीवन जगत होता. तो निसर्गाला देवतासमान मानत होता. सूर्य, चंद्र, नद्या, पर्वत, झाडे आणि प्राणी यांची पूजा केली जात होती. त्यामुळे निसर्ग आणि मानव यांच्यातील नाते अत्यंत पवित्र आणि जिव्हाळ्याचे होते. परंतु आधुनिक काळात परिस्थिती बदलली आहे. औद्योगिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाने निसर्गावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. निसर्गाचा समतोल राखण्याऐवजी त्याचे अति शोषण केले गेले. मोठ्या प्रमाणावर जंगलतोड करण्यात आली, नद्यांचे प्रदूषण झाले, हवेचे प्रदूषण वाढले आणि नैसर्गिक संसाधनांचा अति वापर करण्यात आला. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले आणि हवामान बदलाची समस्या निर्माण झाली. हवामान बदल हा आज जगासमोर उभा असलेला सर्वात मोठा पर्यावरणीय प्रश्न आहे. पृथ्वीचे तापमान हळूहळू वाढत आहे. हिमनद्या वितळत आहेत, समुद्राची पातळी वाढत आहे, पावसाचे प्रमाण अनियमित झाले आहे. काही भागांमध्ये दुष्काळ पडतो तर काही ठिकाणी अतिवृष्टी होते. या सर्व घटनांमुळे मानवाचे जीवन, शेती, प्राणी आणि वनस्पती यांच्यावर गंभीर परिणाम होत आहेत*

*आधुनिक काळात विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, व्यापार आणि संवाद यासारख्या साधनांच्या प्रगतीमुळे जग खूप जवळ आले असून, या प्रक्रियेला जागतिकीकरण म्हणतात. या प्रक्रियेमुळे विविध देशांतील भाषा, संस्कृती आणि जीवनशैली यांचा परस्पर संपर्क वाढला आहे. याचा परिणाम स्थानिक भाषा आणि संस्कृतीवरही होत असून मराठी भाषा आणि तिची सांस्कृतिक ओळख यावरही झालेला दिसून येत आहे. मराठी भाषा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाची आधारभूत भाषा आहे. संत साहित्य, लोकसाहित्य, लोककला, सण-उत्सव आणि परंपरांमधून मराठी संस्कृतीची समृद्ध परंपरा व्यक्त होत आली आहे. गणेशोत्सव, गुढीपाडवा, दिवाळी, नवरात्र यांसारखे सण तसेच तमाशा, लावणी, भारूड, कीर्तन आणि लोकनाट्य यांसारख्या लोककलांमधून मराठी संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप दिसून येते. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग आहे. मात्र जागतिकीकरणामुळे शिक्षण, रोजगार आणि तंत्रज्ञान क्षेत्रात इंग्रजीचे महत्त्व वाढल्याने मराठी भाषेचा वापर काही ठिकाणी कमी होताना दिसत आहे. पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव वाढलेला असल्याचे दिसून येत आहे. तरी डिजिटल माध्यमे, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे मराठी साहित्य, चित्रपट आणि सांस्कृतिक उपक्रमांना जागतिक स्तरावर पोहोचण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे आधुनिकतेचा स्वीकार करताना मराठी भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक परंपरा जपणे आवश्यक आहे. परदेशात स्थायिक झालेल्या मराठी भाषिकांमुळेही मराठी भाषेचा जागतिक प्रसार होत आहे. त्यामुळे मराठी भाषेला जागतिक स्तरावर एक सांस्कृतिक ओळख प्राप्त होत आहे. अशाप्रकारे समाज, शैक्षणिक संस्था आणि शासन यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे मराठीची सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवता येईल आणि ती पुढील पिढ्यांपर्यंत समृद्ध स्वरूपात पोहोचवता येईल.*

**मुख्य शब्द:** जागतिकीकरण, संस्कृती, भाषा, परंपरा.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

## I. प्रस्तावना

ग्लोबलायझेशन ही आधुनिक काळातील एक महत्त्वपूर्ण सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रक्रिया आहे. जागतिकीकरण म्हणजे व्यापार, स्थलांतर आणि सामायिक कल्पनांद्वारे अर्थव्यवस्था आणि संस्कृतीचे एकत्रीकरण होय. जागतिकीकरण ही केवळ आर्थिक गोष्टींशी निगडित असणारी संकल्पना आहे असा अनेकांचा समज चुकीचा आहे. जागतिकीकरण ही सामाजिक, सांस्कृतिक, विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण, ऐतिहासिक, राजकीय अशा सर्व आंतरसंबंध असणाऱ्या पैलूंशी निगडित असणारी संकल्पना आहे. काही अभ्यासकांनी जागतिकीकरणाची सुरुवात मानवीसंस्कृती सभ्यतेच्या उदयापासूनची मानली आहे. तर काही अभ्यासकांच्या मते, १९९० नंतर माहिती व तंत्रज्ञानाच्या ओघामुळे झालेल्या बदलांमुळे जागतिकीकरणाची सुरुवात झालेली आहे असे मानतात. साधारण १९९०च्या दशकात विकसनशील आणि अविकसित देशांना खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाला स्वीकृती द्यावी लागली. जागतिकीकरणामुळे जगभरातील संस्कृती एकमेकांशी जोडल्या जाऊन सांस्कृतिक आधार वाढले ज्यामुळे वेशभूषा, आहार, भाषा आणि मनोरंजन यामध्ये खूप मोठे बदल झाले. जागतिकीकरणाचा विचार केला तर भौगोलिक, भाषिक आणि राजकीय सीमांच्या पलीकडे सामूहिक ओळख, सामाजिक संबंधांना आकार देणाऱ्या कल्पना, अर्थ, प्रतीकात्मक प्रथा यांचे वेगाने होणारे आंतरराष्ट्रीय प्रसारण होय. जागतिकीकरण आणि संस्कृती यांचा घनिष्ठ संबंध असलेला पहायला मिळतो.

जागतिकीकरणामुळे माहिती आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जग जवळ आले आहे. आपल्या मराठी भाषेचा विचार केला तर ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठीला अभिजीत भाषेचा दर्जा मिळाला. आपली मराठी भाषा समृद्ध आहे. महानुभाव संप्रदायाने मराठी भाषेला प्रतिष्ठा मिळवून देत गद्य व पद्य साहित्यातून मराठी भाषेचा भक्कम पाया रचला. 'लीळाचरित्र' हा मराठीतील पहिला चरित्र ग्रंथ लिहून तत्कालीन संस्कृत वातावरणात चक्रधर स्वामींनी मराठी लोकभाषेतून अहिंसा आणि जातीनिरपेक्ष भक्ती तत्त्वज्ञानाचा प्रचार केला. संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेचे महत्व आपल्या ज्ञानेश्वरी ग्रंथात मांडले आहे. "मराठी भाषा अमृतालाही पैजा लावून जिंकेल",असे त्यांनी म्हटले आहे. संत तुकारामांनी आपल्या अभंगातून मराठीला सामान्य जनतेच्या भक्तीची भाषा बनवली. तुकारामांसोबतच निवृत्ती, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव या सर्व संतांनी आपली भक्ती व तत्वज्ञान मराठी अभंग सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवले. मराठी भाषेला जनसामान्यांची आणि संस्कृतीची भाषा बनवली.

ग्लोबलायझेशनमुळे मराठी संस्कृतीला जागतिक स्तरावर ओळख मिळण्यास मोठी मदत झाली आहे. पूर्वी मराठी भाषा आणि संस्कृती मुख्यतः महाराष्ट्रापुरती मर्यादित होती; परंतु आज डिजिटल माध्यमे, सोशल मीडिया आणि जागतिक संप्रेषण साधनांमुळे मराठी साहित्य, संगीत, नाट्य आणि चित्रपट जगभर पोहोचत आहे. परदेशात राहणारे मराठी लोक आपल्या संस्कृतीला जोडून राहतात आणि त्या भागामध्ये ती संस्कृती जतन व संवर्धन करण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे आपल्या मराठी संस्कृतीचा विस्तार भौगोलिक सीमा ओलांडून जागतिक पातळीवर झालेला दिसून येतो. तसेच ग्लोबलायझेशनमुळे मराठी संस्कृतीमध्ये नव्या विचारांची आणि आधुनिक दृष्टिकोनाची भर पडली आहे. विविध संस्कृतीशी संपर्क आल्यामुळे सहिष्णुता, विविधतेचा स्वीकार आणि समन्वय यांसारख्या मूल्यांची जाणीव अधिक दृढ झालेली आहे. शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य, सामाजिक समता यांसारख्या आधुनिक विचारांचा आधार मिळाला असून त्याचा सकारात्मक प्रभाव समाजावर पडतो आहे. त्यामुळे परंपरा आणि आधुनिकता यामध्ये संतुलन साधण्याची प्रवृत्ती निर्माण झाली आहे. शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात मराठी संस्कृतीचा अभ्यास अधिक व्यापक झाला आहे. ग्लोबल नेटवर्क, आंतरराष्ट्रीय परिषदांमुळे आणि संशोधन सहकार्यामुळे मराठी साहित्य, लोकपरंपरा, इतिहास यांचा अभ्यास जागतिक पातळीवर होऊ लागला आहे. यामुळे मराठी संस्कृती एक अभ्यासाचा विषय म्हणून विकसित होत आहे.

ग्लोबलायझेशनमुळे भाषिक समृद्धी देखील घडताना दिसत आहे. मराठी भाषेत नवीन शब्द, संकल्पना येत आहेत. काही जण याला भाषेचे प्रदूषण मानत असले तरी सकारात्मक दृष्टिकोनाने जर याचा विचार केला तर या प्रक्रियेमुळे भाषा अधिक लवचिक, समृद्ध आणि आधुनिक बनताना दिसते. यामुळे मराठी भाषा बदलत्या काळाशी जुळवून घेण्यात सक्षम बनते आणि तिचे अस्तित्व अधिक बळकट होते. ग्लोबलायझेशनमुळे विविध भाषा, संस्कृती आणि संप्रेषण प्रणाली यांचा परस्पर संपर्क वाढला असून त्याचा थेट प्रभाव मराठी भाषेचा वापर, स्वरूप, अभिव्यक्ती आणि सामाजिक स्थानावर पडलेला आहे. मराठी भाषेचा भौगोलिक विस्तार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. आज व्यवसाय, शिक्षण, उद्योग आणि स्थलांतर यांमुळे मराठी भाषिक लोक जगभर विखुरले आहेत. अमेरिका, कॅनडा, युरोप, ऑस्ट्रेलिया तसेच इतर भागांत राहणारे मराठी भाषिक डिजिटल माध्यमांद्वारे मराठी भाषा जिवंत ठेवत आहेत. ऑनलाइन मराठी शाळा, सांस्कृतिक मंडळे, साहित्य संमेलने आणि वेब कार्यक्रम यांच्या माध्यमातून मराठीचा जागतिक समुदाय तयार झाला आहे.

ग्लोबलायझेशनमुळे मराठी लोककलांना जागतिक दृश्यमानता (Global Visibility) प्राप्त झाली आहे. पूर्वी गावोगाव, जत्रा, यात्रा, मंदिर परिसर किंवा स्थानिक मेळावे यांपुरते मर्यादित असलेले तमाशा, लावणी, भारूड, गोंधळ, पोवाडा, कीर्तन यांसारखे प्रकार आता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मंचावर सादर होऊ लागले आहेत. विविध सांस्कृतिक महोत्सव, आंतरराष्ट्रीय कला संमेलने, विद्यापीठीय अभ्यासक्रम आणि पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून या कलांना नव्याने प्रतिष्ठा मिळत आहे. त्यामुळे मराठी लोककला केवळ प्रादेशिक राहिली नसून जागतिक सांस्कृतिक वारशाचा भाग म्हणूनही ओळखली जाऊ लागली आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे लोककलांच्या जतन आणि प्रसाराला मोठी मदत झाली आहे. अनेक पारंपरिक कलाकारांचे सादरीकरण व्हिडिओ, ध्वनिमुद्रण आणि डिजिटल संग्रहालयांच्या माध्यमातून जतन केले जात आहेत. पूर्वी मौखिक परंपरेने टिकणाऱ्या कला आता कायमस्वरूपी नोंदवता येत आहेत. यामुळे पुढील पिढ्यांना त्या सहज उपलब्ध होतील. यूट्यूब, सोशल मीडिया, ओटीटी प्लॅटफॉर्म्स आणि ऑनलाइन कार्यक्रमांमुळे तरुण पिढीला लोककला नव्या रूपात अनुभवता येत आहेत. ग्लोबलायझेशनमुळे माहिती आणि तंत्रज्ञानाच्या प्रसार मोठ्या प्रमाणात झाला आहे. ज्याचा फायदा मराठी संस्कृतीला झालेला दिसतो त्यातून एका नव्या डिजिटल संस्कृतीने जन्म घेतला आहे. मराठी वेब सिरीज, शॉर्ट फिल्म, ब्लॉग्स, पॉडकास्ट, ऑनलाइन नाटक यामुळे सांस्कृतिक अभिव्यक्तीची नवी दालने उघडली जात आहेत. या माध्यमांमुळे ग्रामीण भागातील कलाकारांनाही आपली कला सादर करण्याची संधी मिळाली जी पूर्वी शक्य नव्हती.

ग्लोबलायझेशनमुळे जग जवळ येऊ लागल्या कारणाने सांस्कृतिक पर्यटन वाढले आहे. महाराष्ट्रातील अजिंठा, वेरूळ लेणी, पंढरपूर, कोकणातील लोकजीवन, वारकरी परंपरा या सर्व गोष्टींमध्ये देश-विदेशातील पर्यटकांची रुची वाढली आहे. यामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत आणि यातून सांस्कृतिक वारसा टिकवण्यासाठी आर्थिक आधार मिळत आहे. मराठी भाषेवर जागतिकीकरणाचा आणखी एक सकारात्मक परिणाम म्हणजे अनुवाद क्षेत्राचा विकास. विविध जागतिक साहित्यकृती मराठीत अनुवादित होत आहेत आणि मराठी साहित्य इतर भाषांमध्येही पोहोचत आहे. यामुळे ज्ञानाची देवाणघेवाण वाढत आहे, वाचकांची दृष्टी व्यापक होत आहे आणि मराठी साहित्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थान मिळताना दिसून येत आहे. संतसाहित्य, आधुनिक कथा, कादंबऱ्या आणि विचारवंतांचे लेखन यांचा परिचय इतर भाषिक समाजालाही होत आहे.

ग्लोबलायझेशनमुळे सांस्कृतिक समावेशकता वाढली आहे. विविध भाषा, धर्म, जीवनशैली यांचा स्वीकार करायची वृत्ती वाढल्यामुळे यातून मराठी संस्कृती अधिक समृद्ध आणि बहुआयामी होत आहे. या सर्व प्रक्रियेत मराठी सण आणि उत्सवांना एक नवे रूप प्राप्त झाले आहे. गणेशोत्सव, दिवाळी, गुढीपाडवा यासारखे सण आता केवळ स्थानिक पातळीवर न राहता परदेशातही मोठ्या उत्साहाने साजरे केले जात आहेत. या सणांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, सजावट, व्यवस्थापन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश झाल्यामुळे त्याची आकर्षकता वाढली आहे. त्यामुळे परंपरेला आधुनिकता प्राप्त झालेले दिसून येते. पारंपारिक ज्ञानाला एक नवीन मूल्य मिळाले आहे. आज जगभरात स्थानिक ज्ञान, लोकपरंपरा, पर्यावरण पूरक जीवन शैली यांना महत्त्व दिले जात आहे. कृषी परंपरा, आयुर्वेदिक ज्ञान, निसर्गाशी सुसंगत जीवन प्रक्रिया या सर्व गोष्टी जागतिक स्तरावर अभ्यासल्या जात आहेत. त्यामुळे आपल्या परंपरांचे पुनर्मुल्यांकन होऊन त्यांना नव्या संदर्भात महत्व दिले जात आहे. ग्लोबलायझेशनमुळे मराठी संस्कृतीला केवळ आव्हानेच नाहीत तर अनेक संधीही उपलब्ध झाल्या आहेत. तिच्या प्रसाराला, आधुनिकतेशी जुळवून घेण्याचा आणि नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याला मोठा हातभार लागला आहे. त्यामुळे योग्य दृष्टिकोनातून पाहिलं तर ग्लोबलायझेशन हे मराठी संस्कृतीच्या विकासासाठी एक सकारात्मक आणि पूरक ठरत आहे.

ग्लोबलायझेशनमुळे जग जवळ आले असले तरी त्याची दुसरी बाजू समजून घेणेही महत्त्वाचे ठरते. पाश्चात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव हा ग्लोबलायझेशनच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. आधुनिक काळात तंत्रज्ञान, माध्यमे, शिक्षण, व्यापार, मनोरंजन आणि बदलती जीवनशैली यांच्या माध्यमातून पाश्चात्य संस्कृती जगभर पोहोचली आहे. याचा परिणाम मराठी संस्कृतीवर होताना दिसून येतो हा प्रभाव पूर्णपणे नकारात्मक किंवा सकारात्मक नसून तो मध्यम स्वरूपाचा आहे. कारण भाषेचा विचार केला तर मराठी भाषेवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. इंग्रजी भाषेचे महत्व वाढल्यामुळे मराठी भाषेच्या वापरात घट होताना दिसत आहे. दैनंदिन संभाषणात मराठी बरोबर इंग्रजी शब्दांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. शाळा, कार्यालय आणि तंत्रज्ञान क्षेत्रात इंग्रजीचे प्राबल्य वाढल्यामुळे मराठी भाषेला दुय्यम स्थान मिळाले यामुळे नवीन पिढीमध्ये मराठी भाषेची जाण असलेली दिसून येत नाही. त्याचबरोबर स्थानिक लोककला, पारंपरिक संगीत, मराठी नाट्यकला किंवा साहित्य याकडेही दुर्लक्ष होऊन हॉलीवुड चित्रपट, वेब सिरीज, सोशल मीडिया ट्रेंड्स यांचा तरुणांवर प्रभाव पडताना दिसून येत आहे. कुटुंब व्यवस्थेवरही ग्लोबलायझेशनचा परिणाम झालेला पाहायला मिळतो. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात होती परंतु आज विभक्त कुटुंब पद्धती असलेली पाहायला मिळते.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

त्यामुळे कुटुंबातील व्यक्ती एकमेकांपासून दुरावताना दिसून येत आहेत. पारंपारिक मूल्यांमध्ये घट हा ग्लोबलायझेशन आणि आधुनिकतेच्या प्रक्रियेत दिसून येणारा एक महत्त्वाचा सामाजिक बदल आहे. समाज जसा बदलत राहतो तशी त्याची जीवन पद्धती, विचारसरणी आणि मूल्यव्यवस्थाही बदलत जाते. मराठी संस्कृतीत अनेक वर्षांपासून कुटुंबनिष्ठा, वडीलधाऱ्यांच्या आदर, साधेपणा, सामूहिक सहकार्याची भावना, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी यासारखे पारंपरिक मूल्ये महत्त्वाची मानली जात होती. परंतु आधुनिक जीवनशैली, आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे या मूल्यांमध्येही बदल झालेला दिसून येतो.

सांस्कृतिक ओळख टिकवणे ही कोणत्याही समाजासाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे, कारण संस्कृती ही त्या समाजाच्या इतिहासाची, परंपरेची, मूल्यांची आणि जीवन पद्धतीची ओळख असते. ग्लोबलायझेशन, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेच्या प्रभावामुळे स्थानिक संस्कृतीमध्ये बदल होत असताना मराठी संस्कृतीची ओळख जपण्यासाठी काही उपाय आवश्यक ठरतात. यासाठी मराठी भाषेचे संवर्धन करणे आवश्यक आहे. भाषा कोणत्याही संस्कृतीचा आत्मा असते. त्यामुळे घरात, शाळेत, सामाजिक व्यवहारात आणि दैनंदिन संभाषणात मराठी भाषेचा जास्तीत जास्त प्रमाणात वापर केला पाहिजे. मुलांना लहानपणापासून मराठी वाचन, लेखन आणि संभाषणाची सवय लावली पाहिजे. मराठी साहित्य, वर्तमानपत्रे आणि पुस्तके वाचण्याची प्रेरणा दिली पाहिजे. त्याचबरोबर सण-उत्सव आणि परंपरा जतन करत त्या नवीन पिढीपर्यंत पोहोचवली पाहिजे. यामुळे नवीन पिढींना परंपरांची ओळख करून सामाजिक ऐक्य टिकविण्यास मदत होईल. शिक्षणातून सांस्कृतिक जाणीव निर्माण केली पाहिजे. शाळा आणि महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात मराठी, इतिहास, साहित्य, संतपरंपरा, लोककला आणि सामाजिक मूल्यांचा समावेश करावा. लोककला आणि पारंपरिक कलांना प्रोत्साहन दिले पाहिजे. आधुनिक काळात तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करणे हा प्रभावी उपाय ठरू शकतो. एकूणच मराठीचे सांस्कृतिक संवर्धन होण्यासाठी समाज, कुटुंब, शाळा आणि माध्यमे या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. भाषा, कला, परंपरा आणि मूल्य यांचे संवर्धन केले तर मराठी संस्कृती भविष्यातही तेजस्वी राहील.

ग्लोबलायझेशन ही आधुनिक काळातील बहुआयामी सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रिया असून तिचा मराठी संस्कृतीवर व्यापक प्रभाव पडलेला आहे. या प्रक्रियेमुळे मराठी भाषा, साहित्य, लोककला आणि सांस्कृतिक अभिव्यक्तींना जागतिक स्तरावर नवीन संधी, व्यासपीठे व प्रसारमाध्यमे उपलब्ध झाली आहेत. त्याचवेळी स्थानिक परंपरा, मूल्यव्यवस्था, भाषिक सातत्य आणि सांस्कृतिक स्वायत्तता यांसमोर नव्या प्रकारची आव्हानेही निर्माण झाली आहेत. त्यामुळे जागतिक प्रवाहांचा स्वीकार करताना स्थानिक सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे संवर्धन करणे गरजेचे ठरते. मराठी संस्कृतीचे भवितव्य हे आधुनिकता आणि परंपरा यांतील समतोल, भाषिक आत्मभान आणि सांस्कृतिक सजगता यांवर अवलंबून आहे. अशा संतुलित दृष्टिकोनातूनच मराठीची सांस्कृतिक ओळख अधिक सक्षम, समृद्ध व दीर्घकालीन स्वरूपात टिकून राहू शकते.

## संदर्भसूची –

१. ना. गो. कालेलकर, भाषा आणि संस्कृती, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०१९.
२. डॉ. भालचंद्र नेमाडे, साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, २००३.
३. पु. ग. सहस्त्रबुद्धे, महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९.
४. दुर्गा भागवत, लोकसाहित्याची रूपरेखा, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९९९.
५. संपा. डॉ. रवींद्र शोभणे, जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर, २०१२.
६. डॉ. मधुकर मोकाशी, जागतिकीकरणात मराठी पाऊल, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०११.
७. संपा. डॉ. सौ. सूर्यकांता अजमेरा, प्रा. विनोद उपर्वट, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव, २०११.
८. डॉ. सुनील कुमार लवटे, साहित्य आणि संस्कृती (साहित्यिक लेखसंग्रह), अक्षर तालन प्रकाशन, कोल्हापूर, २०१८.
९. संपा. डॉ. कल्याण काळे, रा. शं. नगरकर, संत साहित्य: अभ्यासाच्या काही दिशा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९२.